Vol III Issue I Feb 2013
Impact Factor : 0.2105
ISSN No : 2230-7850

Monthly Multidisciplinary
Research Journal

# Indian Streams Research Journal

Executive Editor
Ashok Yakkaldevi

Editor-in-chief
H.N.Jagtap

**IMPACT FACTOR : 0.2105**

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya [ Malaysia ]

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus Pop

Mohammad Hailat
Dept. of Mathmatical Sciences, University of South Carolina Aiken, Aiken SC 29801

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Department of Chemistry, Lahore University of Management Sciences [ PK ]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

Nawab Ali Khan
College of Business Administration

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University, Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU, Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Ph.D , Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

Indian Streams Research Journal
Volume 3, Issue.1,Feb. 2013
**ISSN:-2230-7850**
Available online at www.isrj.net

ORIGINAL ARTICLE

# मराठी भाषेतील प्रादेशिक कादंबरीची परंपरा ः एक अभ्यास

खरात एल.व्ही.

मराठी (विभाग) वसत्तराव नाईक महाविद्यालय वसरणी नांदेड .

*सारांशः*

कादंबरी हा एक लोकप्रिय वाङःमय प्रकार आहे . अभ्यासाच्या सोयीसाठी समीक्षकांनी कादंबरीची सामाजिक राजकीय ऐतिहासिक चरित्रात्मक ग्रामीण प्रादेशिक दलित स्त्रीवादी जनवादी आणि पौराणिक कादंबरी अशी वर्गवारी केली आहे . मराठी कादंबरीत प्रादेशिक कादंबरीने एक स्वतंत्र आणि विस्तृत भाग लागले आहे . प्रादेशिक कादंबरीत आणि ग्रामीण कादंबरीत यांच्या घटकात मूलभूत फरक असल्याचे दिसते . ग्रामीण कादंबरीत ग्राम हा घटक महत्त्वाचा असतो . ग्रामजीवन म्हणजे खेडयातील जीवन खेडयाचा गावगारा खेडयातील लोकजीवन तेथील व्यवसाय (जे की प्रामुख्याने शेती) हे व्यवसाय प्रदेशानुसार बदललेले असतात . ब-याचदा ग्रामीण कादंबरी विशिष्ट परिस्थितीत प्रादेशिक कादंबरी म्हणून आविष्कारित झालेली असते . प्रादेशिक कादंबरी विशिष्ट प्रदेश आणि त्या प्रदेशातील लोकजीवनाच्या चित्रणाला अधिक महत्व दिलेले असते .

**प्रस्तावना -**

'फिलीस बेंटले' यांनी 'Regional Novel' (प्रादेशिक कादंबरी) या ग्रंथात प्रादेशिक कादंबरीची व्याख्या केली आहे . ती अशी म्हणते की "प्रोदशिक कादंबरीत विशिष्ट प्रदेशातील जीवनाच्या चित्रणावर भर दिलेला असतो . हे चित्रण असे केलेले असते की त्यातून त्या प्रदेशातील जीवनरीतीची वैशिष्टये वाचकाच्या प्रत्ययाला येतात आणि त्यामुळे हा भाग देशातील अन्य भागा पेक्षा कितीतरी वेगळा आहे . याची जाणीव होते ." याचा अर्थ प्रादेशिक कादंबरीत विशिष्ट प्रदेशातील जीवनरीतीचे चित्रण महत्वाचे असते जे देशातील अन्य भागा पेक्षा वेगळे असते . प्रादेशिक कादंबरी संबंधी डॉ .द .भि .कुलकर्णी यांचे मत असे आहे की "प्रादेशिक कादंबरी हा ग्रामीण कादंबरीचा अधिक वास्तावपूर्ण अविष्कार होय . असे आपण मानतो . आणि म्हणून भौगोलिक दृष्टयाअस्तित्वात असलेला एक वैशिष्टयपूर्ण भू-प्रदेश तेथील मानवसमूह त्यांची वैशिष्टयपूर्ण बोती तेथील वैशिष्टयपूर्ण निसर्ग यांच्या चित्रणाची अपेक्षा आपण प्रादेशिक कादंबरीकडून करीत असतो . या अपेक्षाला धरूनच प्रादेशिक कादंबरीत निसर्गसृष्ट हवी निसर्ग एक महत्वाचे पात्र व्हावे असे आपण समजतो या अपेक्षा रास्तच असतात . परंतु प्रादेशिक कादंबरीचे एवढयाचे भागत नाही . प्रादेशिक मनाचा सामुहिक गजरतीत ऐकू यावा लागतो"[2]

निसर्ग हा खरंच प्रादेशिक कादंबरीचा आवश्यक भाग आहे का ऋ निसर्ग असावा हे प्रादेशिकतचे मूल्यमापन मुळात चुकीचे आहे . सुरूवातीच्या काळात ज्या कादंबरीकरांनी कादंबरीलेखन केले त्यात र .वा .दिघे श्री .ना .पेंडसे चिं .त्र्यं . खानोलकर कादंबरीत उपयोगात आणला . त्यामुळे प्रादेशिक कादांबरीचे मूल्यमापन करताना निसर्ग हा आवश्यक घटक समजला गेला . अशा काही प्रादेशिक कादंर्बया असू शकतात . की ज्यात वैशिष्टयपूर्ण निसर्ग असू शकत नाही . परंतु त्या कादंर्बयात चित्रित झालेले जीनवचित्रण हे त्या प्रदेशाचे वैशिष्टयपूर्ण जीवनचित्रण असू शकते . मराठवाडयासारखा मैलोन मैल सपाट असणारा भू-प्रदेश हा सपाटपणाच ज्याचे वैशिष्टय आहे . या प्रदेशातील जीनवचित्रण करणारे बी .रघुनाथ रा .रं .बाराड़े अथवा मात्र नदीच्या परिसरात असलेली माडगूळकरांची 'बनगरवाडी' ही कादंबरी केवळ निसर्ग वर्णन नाही म्हणून प्रादेशिक कादंबरी नाही असे म्हणणे हास्यास्पद आहे . त्यामुळे फिलीस बेंटले म्हणतात त्याप्रमाणे प्रादेशिक कादंबरीतून त्या प्रदेशातील जीवरीतीची वैशिष्टये वाचकांच्या प्रत्ययास येतात आणि हा प्रादेशिक भाग अन्य भागा पेक्षा वेगळा असतो . हेच मत आपणास योग्य वाटते .

मराठी प्रादेशिक कादंबरीची विचार करतांना र .वा .दिघे श्री .ना .पेंडसे व्यंकटेश माडगूळकर चिं .त्र्यं .खानोलरक अण्णाभाऊसाठे बी .रघुनाथ इ .कादंबरीकारांचा प्रामुख्यने विचार करावा लागतो . र .वा .दिघे हे मराठीतील पहिले प्रादेशिक कादंबरीकार म्हणावे लागतील त्यांनी सुरूवातीला एकूण चार प्रादेशिक कादंब-या लिहिल्या आहेत . अ) 'पाणकळ' **1939** ब) 'सराई' **1943** क) 'आई आहे शेतात' **1957** ड) 'पड रे पाण्या' **1958** 'सराई' ही कादंबरी तसे पाहता कृषी जीवनाशी संबंधीत आहे . परंतु त्या निमित्याने कातोडयांचे ओदवासीचे जीवनचित्रण त्यात येते . ग्रामीण भाषेचा गोडवा याही कादंबरीत आढळतो या कादंबरीत दिघ्यांनी मानवी जीवनाविषयीची व्यापक सखोल सहानुभूती आढळते . कातोडयांचे जीवन पाहता यांची उपजीविका चोरी हे साधन आहे . कातोडयाचे बंड त्यांनी घातलेले दारोड़े कलेले खून मारामाया वाघाची शिकार प्रणयांना धुंद करणारा निसर्ग या धुंद निसर्गाच्या प्रणयात धुंद झालेले मनोहर-लाडी अंकुर्शाभिवरी अशी पात्र आढळतात . या सर्व आकर्षक गोष्टी सोबत काळया रंगात रंगविलेल्या तुकारामा सारखा खलपुरूष आहे . रूपसंपन्न नायिका नायक असा सारा गोतावळा घेवून दिघे 'सराई' ही कादंबरी सजवलेली दिसते . या संदर्भात गंगाधर गाडगीळ म्हणतात की स्वप्नरंजनात्मक साहित्यात जो गहिरेपणा व भडकपणा असतो ती काव्यात्मकता असते प्रेम आणि पराक्रम यांनी भरलेल्या जीवनाचे जे रोमांचकारी चित्रण असते व तीव्र भावनाचा उद्रेक असतो . ते सर्व गुणविशेष 'सराई' या कादंबरीत उत्कट रूपात आहे ."[3] याच काळाचा विचार करत असताना प्रादेशिक कादंबरीला एक नवी दिशा किंवा 'प्रादेशिक कादंबरी' लोकप्रिय ठरली ती श्री .ना पेडंसे यांच्या प्रादेशिक कादंब-या मुळे **1949** पासून अ) 'एल्गार' **1947** ब) 'हद्दपार' **1950** क) 'गारंबीचा बापू' **1951** ड) 'हत्या' **1954** इ) 'रथचक्र' **1962** अशा एका मागून एका पाच प्रादेशिक कादंब-या लिहिल्या याच्या कादंब-यातून प्रदेश जीवनातून पात्र वर उसळून आलेली दिसतात . ती पात्रेही अत्यंत सर्व साधारण असतात . प्रदेश भाषा प्रदेश वैशिष्टये व लोकजीवनाचे चित्रण श्री .ना .पेंडसे गांभीयाने करतात . अशा प्रकारे यांनी मराठी प्रादेशिक कादंबरी समृध्द केली . त्यातल्या त्यात 'गारंबीचा बापू' (**1951**) ही श्री .ना . पेंडसे यांची सर्वात लोकप्रिय तसेच चर्चिली गेलेली आणि समीक्षकांनी अनेक पातळीवर मूल्यमापन केलेली कादअंबरी आहे . 'गारंबीची बापू' प्रातिनिधिक प्रादोकि कादंबरी म्हणून लक्षात घ्यावी लागते . र .वा .दिघे यांच्या कादंबरीत असलेली स्वप्नरंजनात्मकता पेंडसे यांना टाळता आले नाही . निसर्ग आणि माणूस यांचे नाते शोधता शोधता रंजनाचा पदर त्यांच्या कादंबरीत येतोच . त्यामुळेच राधा आणि बापू यांचे प्रेमप्रकरण रंगविले जाते . राधा आणि बापू यांची प्रेमकथा उठावदार करण्याच्या दृष्टीने कोकणातील इतर

माणसे आणि त्यांची भेगवादी वृत्ती यांचे दर्शन घडविले जाते . त्यामुळेच कोकणचा निसर्ग उभा केला जातो . जो आजपर्यंत मराठी वाङ्ःमयाला सर्वस्वी नवीन होता . ही निसर्गवर्णन पेंडसे यांच्या संदर्भात मग कौतुकाचा विषय होतात . मग हा निसर्ग पाहण्यासाठी पेंडसे मित्रमंडळीनी कोकणसहली आयोजीत केल्या त्या सहलीच्या निमित्ताने पुन्हा प्रदेशाच्या निसर्गाचे कौतुक झाले . त्याने पेंडसे यांच्या वाचकवर्गात अधिक भर पडली .[4] श्री . ना . पेंडसे यांच्या कादंब-यातून अगोदर व्यक्तिदर्शनाला अधिक प्राधान्य दिलेले आढळून येते . निसर्ग वर्णनाबरोबर कोकणी माणसाची नस त्यांनी नेमकी पकडली आहे . कोकणाच्या प्रादेशिकतेतील 'माणूस' महत्वाचा गटक आहे असे श्री . ना . पेंडसेंना वाटते . याच कालखंडात अजून एक प्रादेशिक कादंबरीकर म्हणजे अण्णाभाऊसाठे यांचे नाव येते . यांनी अ) 'चित्रा' (1951) ब) 'वैजयंता' (1959) कह 'फकिरा' ह्य1959ह्न डह 'वैजयंता' ह्य1965) इ) 'माकडीचा माळ' ई) 'वारणेचा वाघ' दिघे यांनी आविष्कारित केलेल्या स्वप्नरंजनाचा धागा अण्णाभाऊसाठे यांनी गुंफला आहे . अण्णाभाऊयांना तो टाळता आलेला नाही . र . वा . दिघे यांच्या रंजनात्मकतेला अदभूततेची जोड अण्णाभाऊनी कादंबरीला दिली .

'वारणा' नदीकाठच्या प्रदेश आपल्या कादंबरीतून अण्णाभाऊसाठे यांनी चित्तारला आहे . या प्रादेशिक लोक जीवनाला इतिहासाचा थोडा अधार घेऊन अण्णाभाऊसाठे एर्कएक कादंबरी अुभी करतात . या संदर्भात अण्णाभाऊची 'फकिरा' ही कादंबरी विशेषत्वाने लक्षात घेता येईल . दंतकथा लोककथा यांचा आधार घेऊन फकिरा कादंबरी लिहिली गेलेली दिसते . 'जोगिणीची जत्रा' ही 'वाटेगाव' आणि 'शिगाव' या प्रदेशातील लोकजीवनाचा एक भाग आहे . जोगिणीच्या या जत्रेतील 'विधी' वर आधारित असून हे 'फकिरा' कादंबरीचे महत्त्वाचे निर्मिती केंद्र आहे .

'फकिरा' बद्दल सांगायचे झाल्यास वारणेच्या खोर्यातील महारमांग जमातीचे चित्रण करणारी ही कादंबरी आहे . यात शूर मांग जमातीमधील बार्पलेकाचे चित्रण या कादंबरीत आढळते . 'फकिरा' या कादंबरीच्या प्रस्तावनेतील 'दोन शब्दा' मध्ये वि . स . खांडेकर म्हणतात की "ज्याने फार भोगले आहे सत पडद्यातून नव्हे तर पोटतिडकीन लिहिर्णाया साहित्यिकांचा आत्मा ज्यांच्यापाशी आहे . साहिजिकच त्यांच्या गोष्टी मोझ्या वैशिष्टयपूर्ण असतात . ग्रामीण कथाकार म्हणून दिघे माटे ठोकळ यांच्यापासून व्यंकटेश माडगूळकर मिरासदार शंकर पाटील रणजीत देसाई यांच्या पर्यंत तुम्ही नावे ऐकली तरी तिचा ढंग या सर्वांच्या पेक्षा निराळा आहे . समाजाच्या तळाच्या घरातील माणस घटना व जीवन हे सर्व अण्णाभाऊनी अनुभवलं आहे . टीप कागद जसा ओली अक्षर टिपतो त्याचप्रमाणे लहान पणापासून खेडेगावातील दलितांच्या आयुष्यातील आसव अण्णाभाऊंनी कलावंत मनान टिपूण घेतली आहेत . नुसती आसवंच नाहीत त्यांच्या अशा आकांक्षा त्यांचे रागलोभ सार काही त्यांनी आत्मसात केले आहे .[5] साठे यांनी आपल्या या सर्व कादंर्बयातून एक उपेक्षित जीवनाचे यथातथ्य चित्रण केलेले आहे . या कादंबरीत प्रादेशिकतेचे स्वरूप जीवन संबंध आहे . वेगळया जीवनाचे वेगळे दर्शन घडविणारी ही प्रादेशिक कादंबरी आहे . चिं . त्र्यं . खानोलकर यांनी सुध्दा मराठी मध्ये प्रादेशिक कादंर्बया लिहिल्या आहेत . अ) 'रात्रकाळी घागरकाळी' ब) 'कोंडूरा' क) 'त्रिशंकु' ड) 'गणूराया' आणि 'चाणी' इ . प्रादेशिक कादंब-या खानोलकरांनी लिहिल्या आहेत . ज्या कोकणच्या प्रादेशिकतेवर श्री . ना . पेंडसे कादंबरी लेखन करतात . त्याच प्रदेशातील व्यक्तिजीवन चिं . त्र्यं . खानोलकर आपल्या कादंर्बयातून चित्रत करतात . तसेच या तिघाही कादंबरीकरांचे विषय वेगळे पात्रे वेगळी आणि अभिव्यक्तीची पध्दती वेगळी कोकणचा आगळावेगळा निसर्ग आणि भोगवादी व्यक्तिरेखा हा पेंडसे यांच्या कादंबरीलेखनाचा केंद्रबिंदू असल्याचे दिसते . तर खानोलकरांच्या कादंबरीत भयगंड आणि कामगंडाने पछाडलेल्या विकृत व्यक्तिरेखा आणि कोकण यांचेच चित्रण प्रामुख्याने येतांना दिसते .

बी . रघुनाथ हे मराठवाडयातील प्रमुख कादंबरीकार त्यांचे 'हिरवे गुलाब' 'ओ || 'विद्या आणि वारूणी' या कादंर्बया प्रसिध्द असून या कादंब-यांचे कथानक मराठवाडयाच्या पार्श्वभूमीतील आहे . निजामी राजवटीतील मराठवाडयातील समाजजीवनाचे चित्रण बी . राघुनाथ यांच्या कादंर्बयातून आले आहे . कोणताही कला प्रकार सतत लिहिला जाईलच असे नाही . परंतु तो लिहिला गेला नाही म्हणजे संपला असे होत नाही . त्यामुळे प्रादेशिक कादंबरीची ही आलेली लाट क्वचित ओसरली तरी अशा कादंब-या क्वचित लिहिल्या जातीलच मराठी प्रादेशिक कादंबरी आपली वाटचाल विकासाच्या मार्गाने करीत राही यात शंका बाळगण्याचे कारण नाही .

**निष्कर्ष :-**

प्रादेशिक कादंबरी ही देखील कादंबरी आहे . ती प्रादेीकितेची पथ्ये सांभाळते म्हणून ती प्रादेशिक म्हणून संबोधली जाते . व्यक्ती घटना प्रसंग आणि निसर्ग वातावरणवादी घटक एकजीव झाल्याशिवाय खरी प्रादेशिकता प्रकट होत . त्याचप्रमाणे 'कादंबरी' म्हणूनही सामान्यच राहते . या घटकामध्ये सुसंगती असेल तर जीवनाभूव चेतन्यमय होतो . भावना आणि विचार यातून ती जीवनसत्याचा आविष्कार स्वाभाविकपणे घडविते . मानवी भवभावना चित्रणास साहित्यात विशेष महत्व आहे . ते पुढील प्रमाणे जीवनानुभवातून प्रकट होणे अत्यावश्यक आहे . जसे की 1) व्यक्ती आणि समाज 2) व्यक्ती आणि परमेश्वर 3) व्यक्ती आणि निसर्ग 4) व्यक्ती आणि व्यक्तीचा आत्मा यांचे दर्शन प्रादेशिक कादंबरीकरांनी घडविले आहे . त्याच बरोबर प्रेम दया क्षमा ईर्षा सूड मत्सर द्वेषवादी मानवी भावनांचे दर्शनही प्रादेशिक कादंबरीतून घडते . बदलत्या सरकारकडून झालेली भ्रमनिरास अपेक्षाभंग उपेक्षितांचे मानव म्हणून जगण्याच्या अपेक्षा आणि स्त्री भोग वस्तू नाही . तर ती एक स्वतंत्र व्यक्ती आहे . याची अभिव्यक्ती प्रादेशिक कादंबरीकरांनी केली आहे . हे मानवीमूल्य या प्रादेशिक कादंबरीतून आल्यामुळे ती कादंबरी उत्कृष्ट साहित्य म्हणून स्विकारायला मुळीच हरकत नाही . यावरून असे लक्षात येते की रंगभूमी कलाकार बदलले परंतु नाटक मानवतेचेच आहे . भौगोलिक प्रदेश कोणतेही असेल तेथील परंपरा कोणत्याही असल्यास स्त्री पुरूषांची नावे काहीही असली तरी त्यांचे वर्तन हे मानवी असल्याचेही दाखविते . म्हणून ही उत्कृष्ट साहित्यकृती आहे . असे मला वाटते .

**संदर्भ ग्रंथ :-**

1 . दादा गोरे - गो . नी . दांदेकरांच्या प्रादेशिक कादंब-या प्रतिमा प्रकाशन पुणे .
2 . उपरोक्त कित्ता पृ . क . 10
3 . उपरोक्त कित्ता पृ . क . 11
4 . उपरोक्त कित्ता पृ . क . 13
5 . डॉ . मदन कुलकर्णी मराठी प्रादेशिक कादंबरी : तंत्र स्वरूप मंगेश प्रकाशन नागपूर प्र . आ . 1948 प्र . क . 50

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished research paper.Summary of Research Project,Theses,Books and Books Review of publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

* International Scientific Journal Consortium Scientific
* OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net